# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## परीक्षा विभाग

# शिक्षणामुळे व्यक्तीचे आयुष्य समृद्ध होते

### गजानन टोम्पे : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पदवीग्रहण सोहळा



**राजगुरूनगर (ता. खेड) : येथे पदवीग्रहण कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वाटप करताना उपाधीक्षक गजानन टोम्पे.**

**राजगुरुनगर, दि. ७ (प्रतिनिधी)** - व्यक्तीच्या जडणघडणीत शिक्षणाची प्रक्रिया महत्त्वाची आहे. कारण शिक्षणामुळे व्यक्तीचे आयुष्य समृद्ध करणारी असते. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना सकारात्मक प्रयत्नांना जिद, प्रामाणिकपणा आणि समर्पणशीलतेची जोड दिली तर जीवनाला नेमकी दिशा मिळून यशस्वी आयुष्य जगता येईल, असे प्रतिपादन पोलीस उपाधीक्षक गजानन टोम्पे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित ५ व्या पदवीग्रहण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधिकारी उपाधीक्षक गजानन टोम्पे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात २५४ जणांना पदवीग्रहण करण्यात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केली. सूत्रसंचालन प्रा. एम. एल. मुळूक यांनी केले. परीक्षाधिकारी डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे आयोजन सुजीत जाधव, कैलास बांबळे, नीलेश वाळुंज, वसंत गुंजाळ यांनी केले होते.

प्रभात Sat, 08 February 2020
epaper.eprabhat.net/c/48783111

# 'शिक्षणाची प्रक्रिया आयुष्य समृद्ध करणारी'



राजगुरुनगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित पाचव्या पदवीग्रहण समारंभात पदवी प्रदान करताना उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे.

राजगुरुनगर, (वार्ताहर) : व्यक्तीच्या जडणघडणीत शिक्षणाची प्रक्रिया महत्त्वाची असून ती आयुष्य समृद्ध करणारी असते. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना सकारात्मक प्रयत्नांना जिद्द, प्रामाणिकपणा आणि समर्पणशीलतेची जोड दिली तर जीवनाला नेमकी दिशा मिळून यशस्वी आयुष्य जगता येईल असे प्रतिपादन खेड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांनी केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित पाचव्या पदवीग्रहण कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

गजानन टोम्पे पुढे म्हणाले की, बदलत्या काळात विद्यार्थ्यांसमोर अनेक नवी आव्हाणे असली तरी तशा संधीही उपलब्ध आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःवर विश्वास ठेवून सतत प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. उद्याच्या सुंदर दिवसांसाठी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःची बौद्धिक क्षमता ओळखून आपल्या आवडत्या क्षेत्रात सर्वोत्तमपणे व्यक्त होण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासरुपी मेहनत करून स्वतःला सिद्ध करण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपले करियर करताना नैतिक मूल्य जपणारा चांगला माणूस होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे.. भविष्यात समाजामध्ये विद्यार्थ्यांच्या रूपातून एक आदर्श नागरिक पाहायला मिळावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमात सुमारे २५४ स्नातकांनी पदवीग्रहण केली. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन सुजीत जाधव, कैलास बांबळे, निलेश वाळुंज, वसंत गुंजाळ या प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, सूत्रसंचालन प्रा.एम.एल. मुळूक यांनी तर आभार परीक्षाधिकारी डॉ.व्ही.डी. कुलकर्णी यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख